| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०६/१०/२०२२ | | |
| नोंदणी दिनांक | : | ०६/१०/२०२२ | | |
| निकाल दिनांक | : | ०५/०५/२०२६ | | |
| कालावधी | : | व | म | दि |
| | | ०३ | ०६ | २९ |

# न्यायनिर्णय

**भाग – 'अ'**

| | | |
|---|---|---|
| निशाणी क्र. ४३ | | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, राळेगाव, जि. यवतमाळ<br>यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी – श्री. उमेशचंद्र एम. पाटील)<br>न्यायनिर्णय अदिघोषित दिनांक – ०५/०५/२०२६<br>नियमित फौजदारी खटला क्र. ७५/२०२२ |
| | | गु. र. क्र. ७२/२०२२, पोलीस स्टेशन, **वडकी,** |
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>पोलीस स्टेशन, **वडकी,**<br>ता. राळेगाव, जि. यवतमाळ |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. ए. इंगळे |
| **आरोपी** | | १. **अतुल दामोधर वाणी,**<br>वयः ३५ वर्षे, धंदाः शिक्षक,<br>रा. झाडगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २. | **दामोधर गोविंदा वाणी**<br>वयः ६७ वर्षे, धंदाः शेती,<br>रा. झाडगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ. |
| | | ३. | **केशव गोविंदा वाणी**<br>वयः ५७ वर्षे, धंदाः शेती,<br>रा. झाडगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ. |
| | | ४. | **रविंद्र लिलाधर पालकर,**<br>वयः ४५ वर्षे, धंदाः शेती,<br>रा. वणी, ता. वणी, जि. यवतमाळ. |
| | | ५. | **सौ. सुनिता दामोधर वाणी**<br>वयः ५६ वर्षे, धंदाः शेती,<br>रा. झाडगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ. |
| | | ६. | **सौ. संध्या केशव वाणी**<br>वयः ५० वर्षे, धंदाः शेती,<br>रा. झाडगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | | अधिवक्ता श्री. एम. बी. थुटे | |

## भाग – 'ब'

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्रमांक ४४(II) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | फिर्यादीच्या लग्नाच्या सात ते आठ महिन्यानंतर पासून ते दि. ०५/१०/२०२१ या कालावधीत |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०५/१०/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०६/१०/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०४/०५/२०२६ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अतुल दामोधर वाणी** | सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३/०७/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ | **निर्दोष** | – | – |
| २. | **दामोधर गोविंदा वाणी** | सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३/०७/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ | **निर्दोष** | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | केशव गोविंदा वाणी | सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३/०७/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| ४. | रविंद्र लिलाधर पालकर | सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३/०७/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| ५. | सौ. सुनिता दामोधर वाणी | सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३/०७/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| ६. | सौ. संध्या केशव वाणी | सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३/०७/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |

## भाग – 'क'

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्रमांक ४४(III) अन्वये)

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अस्मिता अतुल वाणी | फिर्यादी | नि. क्र. ४१ |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/ न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

### ब. बचाव पक्षातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

### क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | दोषारोपपत्र | १ |

### भाग – 'ड'

### अभिलेखावरील मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | निरंक |

# न्या य नि र्ण य

(**पारीत दिनांक ०५ मे, २०२६**)

आरोपी हे भा. दं. सं. चे कलम ४९८–अ सह कलम प्रमाणे दंडनीय खटल्यांच्या संपरीक्षेस सामोरे गेले आहेत.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

०२. फिर्यादीचे लग्न **दि. ३०/०५/२०१७** रोजी झाडगांव येथील अतुल दामोधर वाणी यांच्याशी झाले. लग्नानंतर फिर्यादी काही दिवस झाडगांव येथे पतिच्या घरी राहिली. त्यानंतर फिर्यादीच्या पतिला केंद्रिय विद्यालय धर्मपुरी, तामीलनाडू येथे शिक्षकाची नोकरी असल्यामुळे ती त्यांच्यासोबत धर्मपुरी येथे राहण्यास गेली. धर्मपुरी येथे दोन महिने पतिसोबत राहिल्यानंतर फिर्यादीने पतिचा मोबाईल चेक केला असता तिला मोबाईलमधे मुलीचे फोटो दिसले. त्यामुळे फिर्यादीने पतिकडे चौकशी केली. त्यानंतर फिर्यादीच्या पतिने फिर्यादीला रागावले आणि तेव्हापासून तो वारंवार फिर्यादीला मानसिक व शारिरीक त्रास देवून मारहाण करण्यास सुरुवात केली. **दि. १८/०८/२०१७** रोजी फिर्यादी वडकी येथे तिच्या वडीलाकडे गेली आणि त्यानंतर परत ती सासरी झाडगांव येथे राहण्यास गेली. फिर्यादीचे पति अधूनमधून सुट्या असतांना झाडगांव येथे यायचे आणि फिर्यादीला वडीलाकडून पैसे घेवून ये मला गाडी घ्यायची आहे असे म्हणून मारहाण करायचे. फिर्यादीची सासू सुनिता वाणी व सासरे दामोधर वाणी हे सुद्धा फिर्यादीला वडीलाकडून पैसे घेवून ये असे म्हणून मानसिक व शारिरीक त्रास देत होते. झाडगांव येथे आरोपी केशव वाणी

व संध्या वाणी हे सुद्धा लहान–लहान गोष्टींवरुन शिवीगाळ करुन फिर्यादीला मानसिक व शारिरीक त्रास द्यायचे. आरोपी रवि पाल हे अधूनमधून झाडगांव येथे येवून फिर्यादीचे पति आणि तिच्या सासरकडील लोकांना भडकावून द्यायचे व फिर्यादीला शिवीगाळ करुन त्रास द्याययचे. भद्रावती येथे फिर्यादीच्या पतिची बदली झाल्याने ती त्या ठिकाणी राहण्यास गेली असता तेथे सुद्धा फिर्यादीचे पति तिला मारहाण करुन शारिरीक त्रास द्यायचे. **दि. २५/०१/२०१८** रोजी फिर्यादी वडकी येथे वडीलाकडे राहण्यास गेली. त्यानंतर तिला मुलगा झाला. त्यानंतर **दि. १९/०३/२०१९** रोजी फिर्यादी तिच्या पतिकडे भद्रावती येथे गेली. त्यानंतर तिच्या पतिची बदली झाभुआ येथे झाली. त्यामुळे फिर्यादी तिचे सासु आणि सासरे यांच्यासोबत भद्रावती येथेच रहात होती. फिर्यादीच्या पतिने झाभुआ येथे शासकीय निवासस्थान नाही असा बहाणा सांगितल्यामुळे फिर्यादीचे सासु–सासरे झाडगांव येथे राहण्यास गेले. त्यानंतर सप्टेंबर मधे फिर्यादी वडकी येथे गेली आणि त्यानंतर झाडगांव येथे गेली. तिचे पति एकटेच झाभुआ येथे जाण्यास निघाल्याच्या कारणावरुन फिर्यादीने मी सोबत येते असे म्हटले असता फिर्यादीच्या पतिने व सासु–सास–याने फिर्यादीला शिवीगाळ केली आणि मारहाण करण्याचा प्रयत्न केला आणि तिला वडकी येथे निघून जा असे म्हटले. त्यानंतर सागर वाणी यांनी फिर्यादीला वडकी येथे तिच्या वडीलाकडे सोडले. त्यानंतर फिर्यादीचे पति फिर्यादीला फोनद्वारे धमकी द्यायचे. त्यांच्या त्रासाला कंटाळून फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यामधे फिर्याद दिली.

०३. फिर्यादी यांचे फिर्यादवरुन पोलीस ठाणे, वडकी, ता. राळेगाव, जि. यवतमाळ येथे भारतीय दंड संहितेचे कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ना. पो. कॉ. २०६८ रमेश देवराव मेश्राम, पोलीस ठाणे, वडकी यांचेकडे सुपूर्त करण्यात आला. गुन्ह्याचे तपासादरम्यान घटनास्थळ, पंचनामा तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सर्व तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. **नि. क्र. ३३** नुसार आरोपी यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता **कलम ४९८–अ सह कलम ३४** दोषारोप ठेवले. दोषारोपामधील मजकूर आरोपींना त्यांचे भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्यांना गुन्हा कबूल नाही असे निवेदन **नि. क्र. ३४ ते ३९** वर दिले आणि प्रकरणाची संपरीक्षा करण्याची विनंती केली.

०५. आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने फक्त फिर्यादीची साक्ष नोंदविली. फिर्यादीने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे वि. सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन नि. क्र. १ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. सरकार पक्षाच्या पुराव्यांमध्ये कोणतीही गुन्हादर्शक परिस्थिती निर्माण झाली

नसल्याचे आढळून आल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील **कलम ३१३(१)(ब)** अन्वये जबाब नोंदवण्यात आला नाही.

**०७.** अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा पाहता व दोन्ही बाजुचा युक्तिवाद लक्षात घेता, या खटल्याचे न्यायनिर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थित होतात. मी ते खालील कारणमिमांसेद्वारे निष्कर्षास काढत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपी यांनी फिर्यादीच्या लग्नाच्या सात ते आठ महिन्यानंतर पासून ते दि. ०५/१०/२०२१ या कालावधीत मौजे झाडगांव, ता. राळेगांव, येथे त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीकडे वडीलांकडून पैसे घेवून ये म्हणून सदर मागणीच्या पुर्ततेकामी आणि तिला पाप लावून बोलून तिला क्रूर वागणूक देवून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला, हे सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार** |

## कारणमीमांसा

०८. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेसाठी सरकार पक्षाने केवळ फिर्यादी यांना तपासलेले आहे.

**मुद्दे क्र. ०१ करीता** –

०९. फिर्यादी साक्षीदार क्र. १ अस्मिता अतुल वाणी यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, आरोपी क्र. १ तिचे पती आहेत व इतर आरोपी तिचे नातेवाईक आहेत. त्यांचे लग्न आरोपी क्र.१ यांच्यासोबत **दि. ३०/०५/२०१७** रोजी झाले. लग्नानंतर ती सासरी झाडगांव येथे आरोपीकडे नांदण्यासाठी गेली, त्यानंतर ती त्यांचे पतिला धर्मपुरी तामीलनाडु येथे नोकरी असल्यामुळे तेथे गेली. लग्नानंतर काही दिवस आरोपींनी तिला चांगली वागणूक दिली. त्यानंतर काही शुल्लक कारणांवरुन त्यांचे पतिसोबत मतभेद झाले. याशिवाय इतर काही घडले नाही असे सांगितले. त्यांनी फिर्यादवर त्यांची सही असल्याचे सांगून त्यातील मजकूर माहीत नसल्याचे स्पष्टपणे कथन केले. अशाप्रकारे फिर्यादी यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे वि. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचे परवानगीने सदर फिर्यादीला उत्तरसूचक प्रश्न विचारले परंतु अभिलेखावर अभियोगपक्षास उपयुक्त ठरेल अशा कोणत्याही बाबी आल्या नाहीत.

१०. अभिलेखावर आलेल्या एकूण पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून

येते की, फिर्यादी जी की या प्रकरणामध्ये महत्वाची साक्षीदार आहे त्यांनीच आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ त्यांच्याकडे वडीलांकडून पैसे घेवून ये म्हणून सदर मागणीच्या पुर्ततेकामी तिला शारीरिक व मानसिक छळ केल्याबाबत तसेच पैश्याच्या कारणावरुन आरोपींनी त्यांना शिवीगाळ केल्याबाबत, मारहाण केल्याबाबत व शारिरीक आणि मानसिक छळ केल्याबाबत त्यांच्या साक्षीमध्ये काहीही सांगितले नाही. तसेच फिर्यादीने नि. क्र. ४० खाली पुरसीस दाखल करुन न्यायालयास कळविले की, सदर प्रकरण त्यांनी आपसात न्यायालयाबाहेर मिटवले आहे व सदर प्रकरणात त्यांची आपसात न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्यामुळे त्यांना सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही. याकामी उपरोक्त पुराव्यांवरुन आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीकडे पैश्याची मागणी केल्याचे, फिर्यादीला शिवीगाळ करुन मारहाण केल्याचे आणि फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे स्पष्टपणे कुठेही दिसून येत नाही. अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेला गुन्हा शाबीत करणेसाठी सबळ व विश्वासार्ह प्रत्यक्ष किंवा परिस्थितीजन्य पुरावा सादर केला नाही. उपलब्ध पुरावा आरोपींचा गुन्हा सिध्द करण्यास पुरेसा नाही. तथापि, अभियोग पक्षाने आरोपींचा गुन्हा सर्व वाजवी संशयापलिकडे जाऊन सिध्द केला नाही. **म्हणून मी मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.**

**मुद्दा क्र. ०२ बाबत** –

११. न्यायालयासमोर सरकार पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांचे अवलोकन केले

असता आरोपींविरुध्द लावलेले दोषारोप सरकार पक्षाने सिध्द केले नाहीत. म्हणून सबळ पुराव्या अभावी आरोपी हे त्यांच्यावर ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे **कलम ४९८–अ सह कलम ३४** अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. **म्हणून मुद्दा क्र. ०२ चे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.**

## आदेश

| | |
|---|---|
| १. | **आरोपी क्र. १ ते ६** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे **कलम ४९८–अ सह कलम ३४** या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम २४८(१)** अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | **आरोपी क्र. १ ते ६** यांचे वैयक्तिक जातमुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये मा. वरिष्ठ न्यायालयाची अपील नोटीस आल्यानंतर तेथील न्यायालयात हजर राहाण्याकरीता आरोपी यांनी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे जामीन बंधपत्र व तितक्याच रकमेचा वैयक्तिक जातमुचलका द्यावा असा आदेश सदर आरोपींना देण्यात येतो. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व घोषित करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PATIL UMESHCHANDRA MADHAVRAO
Date: 2026.05.05 17:40:38 +0530

**(यु. एम. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राळेगाव,
जि. यवतमाळ.

**स्थळ** – राळेगाव
**दिनांक** –०५/०५/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

a) **Name of the Stenographer** :- R. R. Hardiya,

b) **Court** :- Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Ralegaon.